जगभर

# किनारा तुला पामराला

## चंद्रशेखर पुरंदरे

२००७-०८ला जगभर अन्नधान्याचे भाव कडाडले. प्रामुख्याने जैविक इंधनाला लागणाऱ्या पिकांच्या लागवडीने खाण्याच्या धान्याच्या लागवडीची जमीन बळकावली त्याचा हा परिणाम. त्यात आंतरराष्ट्रीय व्यापारातील सट्टेबाजीची भर पडली. धान्य आयात करणाऱ्या देशांना हा मोठा धक्का होता. परकीय चलनाचा अनियोजित व प्रचंड व्यय, पडेल त्या किमतीला धान्य, भाज्या आयात करणे भाग पडले. मग भारताने अन्नधान्याच्या बाबत स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न सुरू केला. २०००च्या दशकात लोकसंख्या काही कोटीने वाढली मात्र अन्नधान्याचे उत्पादन तेवढेच राहिले. म्हणून आयात.

वस्तुत: याबाबत संपूर्णपणे नाही पण बऱ्याच प्रमाणात देशाची गरज अंतर्गतरीत्या भागवता येणे शक्य आहे. पावसाचा बेभरवसा असला तरी त्या व इतर पाण्याचे अपुरे नियोजन, भूगर्भजलाची खालावणारी पातळी, सदोष वितरणव्यवस्था व गोदामे , जंगलतोड ही मानवनिर्मित कारणे दुरुस्त करण्यासारखी आहेत. ते दीर्घकालीन व निश्चित उपाय होतील. पण या कष्टाच्या व भ्रष्टाचार मंजूर नसणाऱ्या उपायांपेक्षा राज्यकर्त्यांनी (व उद्योजकांनी) सोपा मार्ग स्वीकारला. तो म्हणजे, जगात जेथे शेतजमिनी व मजूर भारतापेक्षा स्वस्तात उपलब्ध असतील, तेथे जावे. आपल्याला लागणाऱ्या पिकांची तेथे लागवड करावी, प्रसंगी अशा लागवडीनंतर खाद्यतेलांसारखे उत्पादनही तेथे करावे व ती पिके व उत्पादने भारतात परत आणावीत.

या धोरणामुळे आफ्रिका, द. अमेरिका, दक्षिण-पूर्व आशियातील अनेक देशांत भारतीय कृषिउद्योजकांनी शिरकाव केला. त्याला प्रोत्साहन म्हणून सरकारने त्या त्या सरकारांशी करार केले, उद्योजकांना करातून सवलती, स्वस्त कर्जपुरवठा, त्या देशातील निर्यात करावर काही अवधीसाठी माफी इत्यादी धोरणे राबवली. या उद्योगात काही अब्ज रुपये गुंतले आहेत. (२०१० पर्यंत १५००० कोटी) भारतीय उद्योजकांनी करारबद्ध केलेल्या जमिनींचे क्षेत्रफळ, देश व प्रस्तावित उत्पादन पहाता या उद्योगाच्या व्याप्तीचा अंदाज येईल. दक्षिण अमेरिका खंडात सुमारे १.५ ते २ लाख हेक्टर - अर्जेंटिना, ब्राझील, पॅराग्वे वगैरे - ऊस, कॉफी, शेंगदाणे. आफ्रिकेत सुमारे ४५ लाख हेक्टर्स - युगांडा, इथिओपिया, काँगो, गॅबन, टांझानिया - ऊस, सोयाबीन, चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ. दक्षिण पूर्व आशियात २ ते ३ लाख हेक्टर्स - इंडोनेशिया, मलेशिया - नारळ, खाद्यतेले वगैरे.

जे काही करार-मदार झाले, ते त्रिपक्षीय. भारत सरकार, यजमान सरकार व भारतीय उद्योजक. म्हणजे ज्याची जमीन किंवा जो जमीन कसतो किंवा वापरतो, त्याला विश्वासात घेतल्याचे दिसत नाही. तो अल्पभूधारक असेल, त्या प्रदेशातील कुरणांवरील मेंढपाळ असेल किंवा छोटा मच्छिमार असेल. परंपरेनुसार पिढ्यान्‌पिढ्या हे लोक तेथे राहिलेले आहेत. भारतातल्या सारखेच त्यांचे जमीनीवरचे हक्क कागदोपत्री व कायदेशीररीत्या सिद्ध करणे शक्य नसले तरी ती जमीन त्यांचीच असते. याखेरीज कुरणे, डोंगर, माळराने ही कोणाच्याच मालकीची नसलेली सार्वजनिक जमीन सगळ्यांच्याच मालकीची असते. तिथे लागवड नाही याचा अर्थ दुसऱ्या कोणी येऊन तेथे लागवड करावी असा होत नाही. भारताबरोबर करार केलेल्या बहुतेक सरकारांचा दावा असा की आमच्या देशात अशी लाखो एकर जमीन उपलब्ध आहे आणि भारतीय उद्योजक ती व्यापारी तत्वावर लागवडीखाली आणू शकतील. निर्णयप्रक्रियेतून ज्याला खरी झळ पोचणार त्यालाच अलगद बाजूला ठेवणे ही प्रक्रिया आपल्याकडच्या सेझ, खाण-उद्योग, धरणे यांच्या नियोजनप्रक्रियेसारखीच. असे करार भारत सरकार, व भारतीय उद्योजकांनी त्या त्या सरकारशी करावेत का, हा पहिला नैतिक मुद्दा.

दुसरा प्रश्न संभाव्य विस्थापितांचा. पश्चिमेतील पर्यायी विकासाच्या पुरस्कर्त्यांनी हा मुद्दा उचलून धरला असला तरी एखाद्या किंवा एकूण प्रकल्पांमुळे किती विस्थापित होतील याची अंदाजेही आकडेवारी उपलब्ध नाही. काही ठिकाणच्या संभाव्य विस्थापितांना नोकऱ्या दिल्या जातील, त्यांच्यासाठी नागरी सुविधा, शाळा, दवाखाने उपलब्ध केले जातील अशी आश्वासने उद्योजकांनी दिली असली तरी ती त्यांच्यावर बंधनकारक नसल्याने ती प्रत्यक्षात कितपत येतील हे संशयास्पद आहे. त्यात मालक म्हणून भारतीयांची कीर्ती आफ्रिकेत चांगली नाही. स्थानिकांना नोकरीवर घेतले तरी नीट वागविले जात नाही, बालमजुरीही करून घेतली जाते अशा तक्रारी पुढे येत आहेत.

पर्यायी विकासाच्या दृष्टीने विस्थापित व त्यांची जीवन-पद्धती हा प्रश्न महत्त्वाचा आहे. प्रत्येक माणसाला किमान त्याच्या आजवरच्या जीवनपद्धतीनुसार जगता येईल असा पर्याय निर्माण झाल्यावरच विस्थापनाचा विचार करता येईल, अन्यथा एक माणूस

विस्थापित करणेही अयोग्य आहे असे म्हणताना हे लक्षात घेतले पाहिजे की इथिओपियासारख्या देशात एकतृतीयांश लोकांना पुरेसे खायलाच मिळत नाही. ते परकीय मदतीवर अवलंबून असतात. म्हणजे त्यांची पारंपारिक जीवनपद्धती त्यांना स्वयंपूर्ण करण्यात अयशस्वी झाली आहे. पर्यायी विकास या अंगाने व्हायला हवा.

त्यात या लोकांची उपासमार कमी करणे हे काही भारतीय उद्योगांचे धोरण नाही. झालीच तर या संख्येत या उद्योगांनी भर पडणेच शक्य आहे. कारण अशा मोठ्या परदेशी उद्योगात स्थानिकांना अत्यल्प प्रमाणात व त्याही अकुशल कामगार म्हणून नोकऱ्या मिळण्याची शक्यता असते. म्हणजे स्थानिक भूमिहीन मजुरांच्या दृष्टीने पडला तर थोडा फरक पडू शकतो, पण बहुसंख्य अल्पभूधारक देशोधडीला लागण्याचीच शक्यता जास्त. त्यात भर म्हणून १९७० च्या दशकापासून अडखळत इथिओपिअन सरकार 'ग्रामिणीकरण' या नावाखाली लोकांचे सक्तीचे स्थलांतरण करत आहे. पारंपरिक गावे सोडायला लावून नवीन वस्तीत लोकांना (काही लाखांच्या संख्येने) हलवण्यात येत आहे. तेथे सुविधाही नाहीत व उपजीविकेच्या संधीही नाहीत. फुटिरतावादी प्रदेशातून, वांशिक संघर्ष असणाऱ्या प्रदेशातून लोकांना हलवून देशाच्या दुसऱ्या भागात नेण्यात येत आहे. त्याविरुद्ध असंतोष आहे. या प्रयोगात हजारोंनी बळीही गेले आहेत. आता हा असंतोष भारतीय उद्योजकांविरुद्धही वळत आहे. मुळात ज्या देशात तिथल्या लोकांना खायला पुरेसे मिळत नाही, त्यांच्या जमिनींवरुन पिकविलेले अन्नधान्य त्यांच्या डोळ्यादेखत परदेशी निर्यात होणार हा कमालीचा विरोध सामाजिक असंतोषात भर घालेल. आफ्रिकेतील सुदानसारख्या इतर देशांत अशा परिस्थितीत वांशिक युद्धे उफाळलेली आहेत.

याला संलग्न प्रश्न म्हणजे, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी परदेशात गेल्यावर करावे काय? जाऊच नये हे एक उत्तर झाले. पण वास्तवात या कंपन्या वर्धिष्णु दिसतात. सरकारसोबत करार करणे व त्या करारावर बोट ठेवून 'सामाजिक प्रश्न आमच्या कक्षेत येत नाही' असे या कंपन्या आजवर म्हणत आलेल्या आहेत. भारताआधीच्या चीनच्या आफ्रिकेतील प्रवेशाने त्या ठिकाणचे सामाजिक संतुलन बिघडल्याचे दिसून आले. मग या कंपन्यांच्या सामाजिक जबाबदारीचा प्रश्न पुढे आला.

म्हणजे देश सक्षम करण्याऐवजी झटपट महासत्ता होण्याच्या महत्त्वाकांक्षेचा भाग आणि भांडवलशाहीचे तर्कशास्त्र यांच्या युतीला शोषणासाठी एक दुबळा स्तर लागतो. भारतात तो स्तर सेझ वगैरेच्या विस्थापितात दिसतो. अल्पभूधारक, जंगलावर जीवन अवलंबून असणारे, छोटे मच्छिमार हा जगभर दुबळा स्तर आहे. अशा ग्रामीण घटकांची वाताहत त्या देशाचे सरकारही करते आणि बाहेरचेही करतात. भारतीय सरकार व उद्योजक या संदर्भात 'बाहेरचे' दिसतात.

या मानवी शोषणाबरोबरच पर्यावरणाची संभाव्य हानी हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. या काही लाख हेक्टर्स जमिनींवर यांत्रिक शेती केली जाणार, एकच पीक काढले जाणार. भारतातल्या हरित क्रांतीसारखे पाणी, रासायनिक खते, कीटकनाशके मोठ्या प्रमाणावर वापरली जाणार. तेव्हा ही उत्पादने करणाऱ्या विदेशी कंपन्यांना भारत ही नवी बाजारपेठ मिळाली त्याबरोबरच आपल्या पर्यावरणाची भरून न येणारी हानी झाली. पिकांच्या अनेक पारंपारिक जाती कायमच्या नष्ट झाल्या, भूगर्भजलाची पातळी खालावली, अतिपाण्याने जमिनी नापीक झाल्या वगैरे. हे दुष्परिणाम तिथेही होण्याची शक्यता आहे.

या सर्व प्रकरणावर पश्चिमेत दोन स्रोतांकडून टीका होत आहे. एक म्हणजे प्रस्थापित वर्ग व त्यांची प्रसारमाध्यमे. त्यांचा रोख असा की आजवर उठसूठ वसाहतवादाच्या नावाने हाकाटी करणारा भारत संधी मिळताच स्वत: तेच करत आहे.

दुसरा आक्षेप पर्यायी विकासाच्या पुरस्कर्त्यांचा. तो वर पाहिला.

या संदर्भात राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन पहाण्यासारखा आहे. इथिओपियात राष्ट्रपती नामधारी असतो. खरी सत्ता पंतप्रधानाच्या हातात असते. भारतीय उद्योगाने विस्थापित होऊ शकणाऱ्या शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ राष्ट्रपतींना भेटले व या प्रकरणात लक्ष घालण्याची त्यांना विनंती केली. राष्ट्रपतींनी पंतप्रधानांना तसा आदेश दिला. तो पंतप्रधानांनी धुडकावून लावला. हाच खेळ काही महिन्यांनी परत झाला.

परदेशातील भारतीय उद्योजकांचा हा नवीन वसाहतवाद नाही का? असे आपल्या तेव्हापासूनच्या कृषिमंत्र्यांना विचारले असता त्यांनी, ''हा व्यापार आहे.'' असे उत्तर दिले! त्यांचे तर्कशास्त्र लवासाचेच! संबंधित राज्यकर्ते अदूरदर्शीपणे मानवी व निसर्गजीवनाची हानी अशी करत आहेत.

या प्रमाणावरचा व्यापार फक्त पैशापुरता मर्यादित रहात नाही. त्यामागे मूल्य करता न येणारी जीवनव्यवस्था, परंपरा असते. ती उद्ध्वस्त होणे हा व्यापार न होता आक्रमण होते. अगदी वसाहतवादाएवढा सम्यक् नाही पण या देशातील भारतीय प्रवेश या दृष्टीने पहायला हवा.

वनानि दहतो वन्हे: सखा भवति मारुत:।
स एव दीपनाशाय कृशे कस्यास्ति सौहृदम्॥

अरण्ये जाळणाऱ्या वणव्याचा वारा हा मित्र होतो (आणि आग पसरवतो) तोच वारा पणतीची ज्योत निमावून टाकतो. दुबळ्या माणसाला मित्र नसतो.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*